



दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार ५ नोव्हेंबर २०२४ | अंक ३३० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# केंद्रीय निवडणूक आयोगाने रश्मी शुक्ला यांची राज्याच्या पोलीस महासंचालक पदावरुन केली बदली

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांची धामधूम सुरु आहे. त्यातच आता एक मोठी घडामोड घडत असल्याचे पाहायला मिळत आहे. राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आली आहे. काँग्रेस नेते नाना पटोलेंनी यांनी रश्मी शुक्ला यांची बदली करावी, अशी मागणी केली होती. यानंतर आता केंद्रीय निवडणूक आयोगाने रश्मी शुक्ला यांची राज्याच्या पोलीस महासंचालक पदावरुन बदली केली आहे. रश्मी शुक्ला यांची बदली करण्यामागचे कारणही समोर आले आहे. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका जाहीर होताच तब्बल २८ पोलिसांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. यात १५ अधिकारी हे मुंबईतील होते. तसेच राज्यभरातील ३०० हून अधिक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या केल्या होत्या. यात रश्मी शुक्ला यांची पोलीस महासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. रश्मी शुक्ला यांच्यावर विरोधकांचे फोन टॅप केल्याचा आरोप आहे. रश्मी शुक्ला यांची सेवा जून 2024 रोजी समाप्त झाली असतानाही भाजप, युती सरकारने जानेवारी 2026 पर्यंत त्यांना नियमबाह्य बढती दिली आहे. त्यांची कार्यपद्धती अत्यंत वादग्रस्त राहिली आहे. त्यांनी नियमबाह्य काम केली आहेत. तसेच विरोधी पक्षातील नेत्यांना धमकावण्याची कामेही त्यांनी केली आहे, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

यामुळे २० नोव्हेंबरपूर्वी त्यांची बदली करावी. रश्मी शुक्ला जोपर्यंत या पदावर आहेत, तोपर्यंत राज्यात निष्पक्ष निवडणूक होणे अवघड आहे, असा गंभीर आरोपही नाना पटोले यांनी केला होता. याबद्दल नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाला पत्र देखील पाठवले होते. अखेर आज निवडणूक आयोगाने रश्मी शुक्ला यांची बदली केली आहे.



## रश्मी शुक्लांवर आरोप काय?

रश्मी शुक्ला यांच्यावर विरोधकांचे फोन टॅप केल्याचा आरोप आहे. या प्रकरणामुळे त्या वारंवार वादात अडकल्या होत्या. याआधी, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा फोन टॅप केल्या प्रकरणी आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला या चर्चेत आल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी रश्मी शुक्ला अवैध पद्धतीने फोन टॅपिंग करत असल्याचा आरोप केला होता. नवाब मलिक यांनी शुक्ला या भाजपच्या एजंट असल्यासारखं काम करतात, असा आरोप केला होता.तसेच रश्मी शुक्ला या देवेंद्र फडणवीसांच्या खूप जवळच्या अधिकारी असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सतत होत असते. रश्मी शुक्ला महाराष्ट्र कॅडरच्या वरिष्ठ IPS अधिकारी आहेत. 1988 बॅचच्या IPS अधिकारी असलेल्या रश्मी शुक्ला फेब्रुवारी 2021 केंद्रीय राखीव पोलीस दलात अतिरिक्त पोलीस महासंचालकपदी प्रतिनियुक्तीवर गेल्या होत्या. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना 2018 मध्ये रश्मी शुक्ला यांची राज्य गुप्तचर विभागाच्या आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली होती. 2019 मध्ये राज्यात सत्ताबदल झाला आणि महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आलं. सप्टेंबर 2020 मध्ये शुक्ला यांना सरकारने पोलीस महासंचालकपदी (DG) प्रमोशन दिलं. त्यांची बदली सिव्हिल डिफेन्सच्या प्रमुख म्हणून करण्यात आली.

## किती मिळाला दर



आंबा बागायतदार उत्तम फोंडेकर यांनी यंदाच्या हंगामातील पहिलीच देवगड हापूस आंब्याची पेटी नाशिकला थेट ग्राहकापर्यंत पोहचवली आहे. दिवाळी पाडव्याच्या मुहुर्तावर त्यांनी चार डझन आंब्यांची पेटी थेट ग्राहकाला विकलेली आहे. या पेटीला 25 हजाराचा विक्रमी भाव मिळाला आहे. फोंडेकर बंधूंनी चौथ्यांदा पहीली आंबा पेटी विक्री करण्याचा मान मिळविला आहे. आंब्याचा हंगाम सुरू होण्यासाठी अजूनही तीन ते चार महिन्यांचा कालावधी आहे. या वर्षाच्या हंगामातील पहिली पेटी फोंडेकर यांच्या बागेतून नाशिकला पाठविण्यात आली आहे.

# हापूस आंब्याची या वर्षाची पहिली पेटी मालवणवरुन नाशिकला रवान

दिवाळीचा सण एकीकडे उत्साहात साजरा होत असताना आंबा प्रेमीसाठी महत्वाची बातमी आली आहे. फळांचा राजा हापूस आंबा याची या वर्षांची पहिली पेटी मालवण येथून नाशिकसाठी रवाना झाली आहे. या मोसमातील हापूस आंब्याची पहिली पेटी असल्याने तिला भाव देखील तेवढा मोठा मिळालेला आहे. दरवर्षी हापूस आंबे सर्वसामान्यांना उन्हाळ्यात खायला मिळत असतात.परंतू त्यांची योग्य देखभाल आणि काळजी करुन हे फळ लवकर पिकविण्याचा मान सलग चौथ्यांदा मालवण कुंभारमाठ येथील प्रसिद्ध आंबा बागायतदार डॉ.उत्तम फोंडेकर यांना मिळाला आहे. जिल्ह्यातील अनियमित पाऊस आणि बदलते हवामान यापासून संरक्षण करुन बुरशी आणि इतर किडीवर मात करीत फोंडेतर बंधूना हे मोसमातील पहिले फळ पिकविण्यात यंदाही यश आले आहे. फोंडेकर यांनी सलग चौथ्यांदा राज्यातील सर्वप्रथम आंबा पेटी बाजारात पाठविण्याचा विक्रम केला आहे.त्यांच्या कार्याबद्दल त्यांना डॉक्टरेट प्रदान केली असून मालवण तालुका कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे यश मिळविले आहे. उत्तम फोंडेकर आणि सुर्यकांत फोंडेकर बंधूंचे कृषी अधिकारी एकनाथ गुरव यांनी अभिनंदन केलेले आहे.

## वर्गमित्र दहावी २००७ बॅच विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

प्रतिनिधि- धारूर शहरातील जनता प्रा. व मा.विद्यालयातील सन 2007 मधील दहावी वर्गमित्राचा स्नेहमेळावा श्री क्षेत्र अंबाचौंडी येथे संपन्न झाला असून त्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सीमा शिनगारे मॅडम या उपस्थीत होत्या,तसेच प्रमुख पाहुणे म्हणून महादेव शिनगारे सर, मंत्रे सर,शिंपले सर,गायके मॅडम, उज्वला मॅडम , मिठू सर व अशोक मामा हे कार्यक्रमाला उपस्थित होते. सर्व शिक्षकांनी सर्वांना मार्गदर्शन केले याप्रसंगी महादेव शिनगारे सर यांनी मोबाईलचा होत असलेला अतिवापर व त्यामुळे होणारे बालमनावर होणारे परिणाम याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले त्यांनी दिलेली शिक्षणाची शिदोरी घेऊन विद्यार्थ्यांनी आयुष्यात पुढे जावं खूप पुढे जावो लोकांना सांगताना मला अभिमान होतो की हा माझा विद्यार्थी आहे असे सांगताना आम्हाला खूप आनंद होतो. तसेच



शिंपले सर, मंत्री सर, शिनगारे सर,उज्वला मॅडम यांनी सर्व त्यांच्या माजी विद्यार्थ्यांना बहुमूल्य असे मोलाचे मार्गदर्शन केलेले आहे.जुन्या आठवणींना उजाळा देत आज आपण तब्बल 17 वर्षांनी एकत्र आलोत याप्रसंगी जुने नवे अनुभव सांगताना सर्वांच्या डोळ्यांमध्ये आनंदाश्रू येत होते. या स्नेह मेळाव्यासाठी आलेल्या सर्व मित्र मैत्रिणी यांनी आपआपले अनुभव शेअर केले याप्रसंगी खूप जणांनी त्यांच्या जीवनामध्ये बदल कसा झाला ते आज काय करतात ते उद्या काय करू इच्छिता याप्रसंगी सांगितले सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आणि शेवटी अध्यक्षीय समारोप हा सीमा मॅडम यांच्या मनोगताने झालेला आहे.सीमा मॅडम यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले होते की, खरंच की आमचे चेहरे तर तेच आहेत पण समोर बसलेल्या विद्यार्थ्यांमध्ये जे माझे विद्यार्थी होते त्यांचे चेहरे बदललेले आहेत खूप असा बदल झालेला आहे त्यामुळे जे मला माहित होते जे उन्नड होते तेच माझ्या लक्षात आहेत बाकी लक्षात नाहीत असे त्यांनी सांगितले म्हणजे ज्या ज्या गोष्टी त्यांनी शाळेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये पहिल्या त्या गोष्टी आज येथे त्यांना दिसल्या नाहीत आज त्यांना एक सभ्य संस्कारी विद्यार्थी त्यांच्यासमोर दिसले खरंच खूप आनंद झाला असे त्यांनी सांगितले. या स्नेह मेळाव्यास सूत्रसंचालन ॲड.युवराज फुन्ने यांनी केले तर आभार प्रदर्शन माधुरी तिबोले हिने केले...

## आ.संदिप भैय्यांची मोमीनपुरा भागात रॅली गाठीभेटीचे रूपांतर झाले प्रचार रॅलीत



बीड (प्रतिनिधी):- शहरातील मोमीनपुरा भागात आ.संदिप क्षीरसागर हे निवडणुक प्रचाराच्या अनुषंगाने शनिवार दि.2 नोव्हेंबर 2024 रोजी गेले असता गाठीभेटी घेण्या करिता गेले असता त्याचे रूपांतर प्रचार रॅलीत झाले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व मित्र पक्षांच्या महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.संदिप क्षीरसागर हे बीड शहरातील मोमीनपुरा भागात निवडणुक प्रचारार्थ गाठीभेटी घेण्यासाठी गेले होते. या भागातील सर्व तरूण, नागरिक यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने सदरील गाठीभेटीचे रूपांतर अक्षरश: प्रचार रॅलीत झाले. या प्रसंगी भागातील सर्व नागरिक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशवंती आधार समाजिक संस्थेने केली निराधार,अनाथ, दिव्यांग बांधवांची दिवाळी गोड

**एक घास प्रेमाचा या प्रेरणादायी उपक्रमाच्या माध्यमातून वृद्धाश्रम आश्रम, दिव्यांग आश्रम, अनाथ आश्रम, तसेच पालावर रस्त्याच्या कडेला व पुलाखाली राहणाऱ्या निराधार बांधवांना ब्लॅकेट व फराळ वाटून दिवाळी गोड केली.- मा.राजेश दिवटे**



**पाटोदा प्रतिनिधी**

दिवटे सर खूप बरे वाटले आपण एवढ्या प्रेमाने दिवाळी फराळ आणला आम्हाला भरवला.... हे शब्द ऐकून मन भाराहून गेले.

यशवंती आधार सामाजिक संस्थेच्या वतीने एक घास प्रेमाचा या उपक्रमाच्या माध्यमातून अनाथ, निराधार दिव्यांग बांधवांची दिवाळी गोड व्हावी म्हणून दिवाळी फराळ वाटप केला जात आहे हा उपक्रम निगडी येथिल झुंज दिव्यांग आश्रमामध्ये राबवला तसेच दिघी येथील स्नेहछाया अनाथल, आळंदी येथील आपुलकी वृद्धाश्रम तसेच पुलाखाली व पालवर राहणाऱ्या निराधार बांधवांसाठी राबवला. या सर्व कार्यामध्ये संस्थेचे मार्गदर्शक गोसेवक सेवक संतोष सुरवसे साहेब, महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्रमुख जयपालजी दगडे साहेब, यशवंती आधार सामजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रेरणादायी वक्ते राजेश दिवटे सर हा प्रेरणादायी उपक्रम राबवत आहेत व त्यांच्या या कार्याला भरभरून प्रतिसादही मिळत आहे.तसेच या उपक्रमासाठी ज्यांनी- ज्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या मदत केली त्या सर्वांचे संस्थेच्या वतीने राजेश दिवटे यांनी मनापासून आभार मानले.

# मराठी साहित्य व संस्कृतीतील परंपरा जपणारे श्री.अनिल आयरे

दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश आणि उत्साहाचा सण. दिवाळीतील लक्ष्मीपूजन, फटाके, रांगोळ्या, फराळाच्या पंगती आणि भेटवस्तू हे सणाचे प्रमुख घटक असले, तरी महाराष्ट्राच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक जीवनात दिवाळी अंक या विशेष घटकाने एक वेगळं स्थान मिळवलं आहे. ही परंपरा म्हणजे मराठी साहित्य आणि वाचकांमधील एक सजीव संवाद आहे, जो दशकानुदशके चालत आला आहे. दिवाळी अंकांच्या माध्यमातून अनेक लेखकांना व्यासपीठ मिळाले, तर वाचकांनाही विविध विचार, तत्त्वज्ञान आणि कलांचा आस्वाद घेण्याची संधी मिळाली. ठाण्यातील अनिल आयरे यांच्या वडिलांनी - श्री शरद विश्राम आयरे यांनी ठाण्यात सुमारे पन्नास वर्षांपूर्वी पुस्तकांचा स्टॉल सुरू केला. यामध्ये त्यांनी अनेक प्रसिद्ध लेखकांची पुस्तके विक्रीसाठी ठेवली. वाचकांच्या आग्रहामुळे त्यांनी दिवाळी अंकही ठेवायला सुरुवात केली. ही परंपरा अनिल आयरे गेली अनेक वर्ष जपत आहेत. ठाण्यातील शारदा पुस्तकालय हे एक अत्यंत जुने आणि प्रतिष्ठित पुस्तकांचे दुकान आहे. मागील पन्नास वर्षांपासून हे दुकान ठाण्यातील वाचनप्रेमींसाठी एक महत्त्वाचे केंद्र ठरले आहे. श्री. अनिल आयरे या परंपरेचा वारसा समर्थपणे पुढे नेत आहेत. दिवाळीचा सण जसजसा जवळ येतो, तसतसे या दुकानात दिवाळी अंकांची विशेष तयारी सुरू होते. श्री. आयरे हे दरवर्षी वेगवेगळ्या दिवाळी अंकांचे प्रचार आणि प्रसार करण्यासाठी विशेष प्रयत्न करतात. दिवाळी अंकांची निवड, त्यांच्या शेल्फ्सवर मांडणी, तसेच वाचकांपर्यंत योग्य माहिती पोहोचवण्यासाठी ते सतत कार्यरत असतात. शारदा पुस्तकालयात उपलब्ध असलेल्या विविध दिवाळी अंकांमध्ये कथा, कविता, लघुकथा, सामाजिक विषयांवरील लेख, आणि समीक्षण यांचा उत्तम संगम आढळतो, ज्यामुळे वाचनप्रेमींना एक अद्वितीय अनुभव मिळतो.

दिवाळी अंकांची परंपरा सुमारे शंभर वर्षांपूर्वी सुरू झाली. १९२० च्या दशकात काही वृत्तपत्रांनी दिवाळीच्या सुमारास विशेषांक काढण्यास सुरुवात केली. तत्कालीन वृत्तपत्रांनी, मासिकांनी समाजातील घडामोडी, सांस्कृतिक कार्यक्रम, साहित्यिक चर्चासत्रे व लेखांसाठी एक खास व्यासपीठ निर्माण केले. साहित्यिकांच्या लेखनकलेसाठी हे एक उत्तम संधीचे माध्यम बनले, ज्यामुळे ही परंपरा अधिकाधिक लोकप्रिय होत गेली. काही प्रमुख दिवाळी अंक म्हणजे 'किर्लोस्कर', 'मनोहर', 'मौज', 'असा मी असामी', आणि 'सत्यकथा'. या अंकांमध्ये कथा, कविता, लेख, निबंध, समीक्षण, अभिप्राय, विज्ञान लेखन, सामाजिक समस्या यांच्यावर लेखन झाले, जे लोकांना विचारप्रवृत्त करत होते. दिवाळी अंकांनी एक प्रकारे मराठी साहित्यातील नवनवीन प्रवाहांना दिशा दिली आहे. विशेषतः सामाजिक, राजकीय, आणि सांस्कृतिक विषयांवर आधारित लेखांमुळे या अंकांनी लोकांना विचार करण्यास प्रवृत्त केले. दिवाळी अंक हे केवळ करमणूक आणि मनोरंजनाचे साधन राहिले नाहीत, तर ते समाजातील विविध घटकांना जोडणारे आणि साहित्य क्षेत्रात विचारांची देवाण-घेवाण घडवून आणणारे एक महत्त्वाचे माध्यम ठरले. विशेषतः ग्रामीण जीवन, शहरीकरण, राजकीय घडामोडी, सामाजिक असमतोल यांसारख्या विषयांवर आधारित लेख या अंकांमध्ये असतात. अनेक दिवाळी अंकांत काव्यलेखन, लघुकथा, ललित लेख, आणि वैचारिक लेख आढळतात. त्यामुळे दिवाळी अंक हे साहित्यिक दृष्टीने अधिकच समृद्ध मानले जातात. बऱ्याच लेखकांनी त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीची सुरुवात या दिवाळी अंकांमधून केली आहे. त्यामुळे ते एक प्रकारचे साहित्याचे प्रवेशद्वार ठरले आहे. दिवाळी अंकामुळे नवोदित लेखकांना मोठ्या प्रमाणात वाचकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली, तसेच वाचकांनाही त्यांच्या विचारांची मांडणी वाचण्याची संधी मिळाली. तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे आज वाचनाचे माध्यम आणि सवयी मोठ्या प्रमाणात बदलल्या आहेत. डिजिटल पुस्तकं, ऑनलाइन मॅगझिन्स, ऑडिओबुक्स यांच्या उपलब्धतेमुळे वाचकांचं वाचन डिजिटल प्लॅटफॉर्मवर झुकले आहे. मात्र, दिवाळी अंक आजही आपल्या सजीवपणासह टिकून आहेत. आजही अनेकांकडून दिवाळी अंकांची आतुरतेने वाट पाहिली जाते. त्याचं कारण म्हणजे दिवाळी अंकांची दर्जेदार सामग्री, जी इतर डिजिटल माध्यमांपेक्षा अधिक विचारशील आणि अभ्यासपूर्ण असते. यात भर म्हणून, अनेक दिवाळी अंकांनी डिजिटल माध्यमांचा वापर करून स्वतःला टिकवून ठेवले आहे. आजकाल अनेक दिवाळी अंक त्यांच्या अंकांचे डिजिटल स्वरूपातही प्रकाशन करत आहेत, ज्यामुळे नव्या पिढीलाही या परंपरेचा अनुभव घेता येतो. यामुळे दिवाळी अंकांच्या वाचनात सातत्य राखलं जातं आणि त्यांचा आवाका वाढतो. दिवाळी अंकांनी समाजातील प्रश्नांना वाचा फोडून त्यावर चर्चा घडवून आणण्याचे कार्य केले आहे. स्त्रीशिक्षण, समाजातील वर्गविभाजन, जातिव्यवस्था, महिलांचे हक्क, पर्यावरण संवर्धन असे विविध मुद्दे दिवाळी अंकांमधून अधोरेखित केले गेले आहेत. त्यामुळे दिवाळी अंक हे समाजप्रबोधनाचे एक महत्त्वाचे साधन ठरले आहे. मराठी भाषेत नवनवीन साहित्य निर्माण करणे आणि त्यातून समाजाला योग्य दिशा देणे हे कार्य दिवाळी अंक करत आहेत. दिवाळी अंक म्हणजे महाराष्ट्रातील साहित्य व संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. त्यांनी केवळ मनोरंजनाचे नव्हे तर समाजाला विचारांची दिशा देण्याचे कार्य केले आहे. बदलत्या काळातही या परंपरेला अद्यापही टिकून राहण्यात यश आले आहे. दिवाळी अंकांच्या या परंपरेने मराठी साहित्याला एक नवीन परिमाण दिले आहे, आणि ही परंपरा पुढेही चालू राहून समाजाला नवीन विचारसरणी देत राहील, याची खात्री आहे. श्री. अनिल आयरे यांच्या प्रयत्नांमुळे दिवाळी अंकांची ही परंपरा ठाण्यात जिवंत राहिली आहे. त्यांचे हे कार्य साहित्य आणि वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी अनमोल आहे.



प्रा प्रज्ञा पंडित
लेखिका समीक्षक

# पनवेल येथे आनंददायी शिक्षण यावर आधारित शैक्षणिक कार्यशाळा संपन्न

पालक आपल्या पाल्यांना विश्वासाने इतर कोणापेक्षाही शिक्षकांच्या हवाली करतात. त्यामुळे मुलांच्या भावना समजून घेऊन त्यांच्यावर उत्तम नागरिक बनवण्यासाठी योग्य ते संस्कार करण्याकरता शिक्षिकेला विद्यार्थ्यांची आई व्हावे लागते." असे भावपूर्ण उद्गार प्राचार्य डॉ.रमा भोसले यांनी काढले. पनवेल येथील शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात पनवेल तालुक्यातील पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षकांकरिता नुकतेच आयोजित केलेल्या 'आनंददायी शिक्षण' या शैक्षणिक कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी त्या बोलत होत्या. त्यापुढे म्हणाल्या," सध्या मुलांना विविध प्रकारच्या खेळण्यां पेक्षा मोबाईल जास्त आवडू लागला आहे, हे काही चांगले चिन्ह नाही. त्यापेक्षा मुलांना खेळू द्या. एकमेकांसोबत मौज मस्ती करू द्या. हवं तर भांडू द्या. त्यामुळेच त्यांचा सर्वांगीण विकास होतो,असेही त्या पुढे म्हणाल्या.
पनवेल तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तथा आगरी कोळी शिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री. पंकज भगत यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच श्री.पंकज भगत सर यांची महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ मुंबई विभागातून सदस्यपदी निवड झाल्याबद्दल दोन्ही संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमरदीप बाल विकास फाउंडेशनचे संस्थापक एन.डी.खान यांनी केले. सकाळच्या सत्राचे सूत्रसंचालन सौ. ऋता भामरे यांनी ओघवत्या शैलीत केले. या प्रशिक्षणाचा लाभ पनवेल तालुक्यातील विविध शाळांमधून आलेल्या शिक्षकांनी घेतला. प्रशिक्षणापूर्वी दीपक कदम यांनी व्यायाम व गीत गायनाने प्रशिक्षणार्थींची बैठक तयार करून घेतली. पोद्दार महानगरपालिका प्राथमिक शाळा सांताक्रुझच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सौ. मीनल दीक्षित यांनी उत्तम रीतीने उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाची संकल्पना एन.डी. खान यांची होती . सौ.मिनल दीक्षित यांनी कार्यशाळेची सुरुवात आपल्या सुरेल आवाजात विविध अभिनय, बडबड, व



बालगीते गाऊन वातावरणनिर्मिती केली. त्या अगदी समरसून जवळकीच्या भाषेत बोलत होत्या."प्रौढत्वी निज शैशवास जपणे" म्हणजे काय याचा जणू त्यांनी वस्तूपाठच आखून दिला. 'इसापनीती' मधील अनेक गोष्टी गीताच्या माध्यमातून त्यांनी एक रूप होऊन आपुलकीने सांगितल्या. दुपारच्या सत्रात त्यांनी शिक्षि कांचे विविध गट बनवून त्यांच्याकडून अनेक उपक्रम राबवून घेतले. त्या प्रसंगी त्यांनी अनेक टाकाऊ पदार्थांपासून टिकाऊ वस्तू बनवून घेतल्या. विविध कोलाज, चिकटकाम करून घेतले. त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना विषय अधिक रंजकतेने व सुलभतेने समजण्या साठी होतो.ही कार्यशाळा अतिशय रंजक व माहितीपूर्ण झाली. दुपारच्या सत्रात सुरुवातीला आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्ते डॉ. रत्नाकर अहिरे यांनी त्यांना उपलब्ध झालेल्या अतिशय कमी "वेळात आत्मविश्वास कसा वाढवावा?" याचे प्रत्यक्षिका सहित प्रशिक्षणार्थींना धडे दिले. समारोप समारंभाचे सूत्रसंचालन श्रीमती संध्या भुजबळ यांनी उत्कृष्टपणे केले.प्रमुख पाहुणे माजी शिक्षण उपसंचालक व्ही.एस. म्हात्रे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "प्रयोगशाळेची कमतरता असेल तर आजूबाजूच्या वस्तू वापरून आपण विज्ञानाचे प्रयोग करू शकतो." तसेच त्यांनी आपल्या विविध अनुभवाचे माहितीपूर्ण किस्से सांगून कार्यक्रमात रंगत आणली. यावेळी वीरस्वामी चे संस्थापक प्रा.संजय हिरेमठ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी सौ. पूनम गुप्ता, सौ. नानजीन पालेकर, पत्रकार श्री. सुनिल भुजबळ वगैरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक सौ. सलमा खान, प्रा.संजय हिरेमठ व सौ.भाग्यश्री भुजबळ होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राजकुमार ताकमोगे, सौ. मीना ताकमोगे व इतर कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ठाणे जनता सहकारी बँकेत प्रा. प्रज्ञा पंडित यांचे माईंडफुल बँकिंग विषयी व्याख्यान

ठाणे जनता सहकारी बँक ही ठाण्यातील अग्रगण्य बँक म्हणून ओळखली जाते. बँकेने केवळ ग्राहकांच्या हितासाठीच नव्हे तर आपल्या कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी देखील अनेक उपक्रम राबवले आहेत. कर्मचाऱ्यांसाठी वेगवेगळे प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, शिबिरे आणि सामाजिक उपक्रम बँकेतर्फे सातत्याने आयोजित केले जातात, यामुळे कर्मचारी वर्गाचा आत्मविश्वास वाढतो आणि बँकेची सेवासुविधा अधिक सक्षम होते.

याच उपक्रमांतर्गत ठाणे जनता सहकारी बँकेने प्राध्यापिका प्रज्ञा पंडित यांच्या 'अवेअकनिंग अवेअरनेस फॉर माईंडफुल बँकिंग विथ द विष्णु सहस्त्रनाम' या विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते. या व्याख्यानात बँकेच्या प्रत्येक शाखेतील प्रातिनिधिक कर्मचारी उपस्थित होते. या विशेष सत्रात प्रा पंडित या सत्रात प्राध्यापिका प्रज्ञा पंडित यांनी विष्णुसहस्त्रनाम आणि इतर धार्मिक स्तोत्रांच्या उपासनेद्वारे बँकिंग क्षेत्रात येणाऱ्या मानसिक ताणतणावाचे नियोजन कसे करता येईल, यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी विष्णुसहस्त्रनामातील संकल्पना आणि त्यातील सकारात्मक ऊर्जेचा आपल्या दैनंदिन जीवनात कसा वापर करता येईल, याविषयी माहिती दिली. या मार्गदर्शनामुळे कर्मचाऱ्यांना तणावमुक्तीचे महत्त्वपूर्ण तंत्र मिळाले. या व्याख्यानामुळे आम्हाला प्रेरणा मिळाली असून आमच्या ज्ञानात भर पडली अशी प्रतिक्रिया उपस्थित कर्मचारी आणि अधिकारी वर्गाने दिली.

या कार्यक्रमाचे आयोजन बँकेचे चेअरमन श्री.शरद गांगल, बोर्ड ऑफ डायरेक्टर सदस्य श्रीमती अश्विनी बापट यांनी केले. शाखा व्यवस्थापक पूजा यल्लतीकर यांनी या कार्यक्रमाचे




समन्वयन प्रभावीपणे सांभाळले. ठाणे जनता सहकारी बँकेच्या या उपक्रमाला बँकेतील कर्मचाऱ्यांनी उदंड प्रतिसाद दिला.

# डॉ लक्ष्मण शिवणेकर यांना संत नामदेव राष्ट्रीय अनुवाद साहित्य पुरस्कार 2024 घोषित

साहित्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल व साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. लक्ष्मण शिवणेकर यांच्या गुरुकिल्ली स्मरणशक्तीची, मार्क शेनन या अनुवादित ग्रंथाच्या उत्कृष्ट निर्मितीबद्दल समृध्दी प्रकाशन संस्था हिंगोली यांच्या वतीने दिला जाणारा संत नामदेव राष्ट्रीय अनुवाद साहित्य पुरस्कार 2024 साठी निवड करण्यात आली असल्याचे प्रा. डॉ. श्रीराम कऱ्हाळे यांनी कळविले आहे.

मार्क शेनन हे जगप्रसिद्ध अभिनेता व महान स्मरणपटू. त्यांनी आपली स्मरणशक्ती कशी वाढविली आणि त्यामुळेच पेशात यशस्वी झाले. स्मरणशक्ती कशी वाढवावी या संदर्भात अनेक कार्यशाळा घेतल्या. जगात अनेक विश्वस्तरीय स्मरणपटू घडविले. उद्योग जगतातील एक्झिक्युटिव्हज व अनेक प्रभावी व्यक्तिमत्वे घडविली. त्यांच्या अनुभवावर आधारित व्यवहार्य प्रणाली व सूत्रे विकसित केली. त्याने पुस्तकाच्या रूपात बेस्ट सेलर म्हणून लौकिक प्राप्त केला. यात स्मरणशक्ती, अध्ययन चक्र , सृजनशील स्मरणशक्ती, समृती महाजाल, मनोरेखन स्मृतीवर प्रभुत्व प्राप्त करून दुसऱ्यावर छाप टाकणे व प्रभाव पाडणे, जीवनात यशस्वी होणे अशा विविध जीवनोपयोगी कौशल्यांचा व विचारांची मांडणी करण्यात आली आहे. त्यामुळे या पुस्तकाची उपयुक्तता उच्च दर्जाची झाली आहे. अशा या उपयुक्त ग्रंथाचा अनुवादही चांगला झाला आहे. पुरस्कार देऊन पुष्टी केली आहे. हे पुस्तक दर्जेदार साहित्य निर्मितीसाठी प्रसिद्ध असलेल्या मेहता पब्लिशिंग हाऊस यांनी प्रकाशित केले आहे




# पद्मविभूषण खा. शरदचंद्रजी पवार यांचे पाडव्यानिमित्त पदाधिकाऱ्यांनी घेतले आशीर्वाद

## तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांच्यावर झालेल्या खोट्या गुन्ह्याची पवार साहेब व आ रोहित दादा पवारांकडून विचारपूस

परळी (वार्ताहर) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा शरदचंद्र पवार यांचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज, विधानसभा अध्यक्ष किरण काका पवार, शहराध्यक्ष अँड जीवनराव देशमुख या पदाधिकाऱ्यांनी दिवाळी पाडव्यानिमित्त भेट घेऊन आशीर्वाद घेतले. याप्रसंगी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या संदर्भामध्ये तसेच तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांच्यावर झालेल्या खोट्या गुन्ह्याच्या संदर्भात आ. रोहित दादा पवार यांनी विचारपूस करून माहिती जाणून घेतली तसेच शरदचंद्र पवार साहेब यांना सुद्धा विशेष परिचय करून देत परळी तालुकाध्यक्ष यांच्यावर काही दिवसापूर्वी खोटा गुन्हा दाखल केला होता हे सांगितलं या प्रसंगी असे खोटे गुन्हे अनेकांवर परळी मध्ये दाखल होत आहेत याची मला कल्पना आहे असे पवार साहेबांनी सांगितले. खा शरदचंद्रजी पवार साहेब,, आ रोहित दादा पवार, युगेंद्र दादा पवार यांनी यावेळी परळी विधानसभा मतदारसंघातील परिस्थिती जाणून घेत कुठल्याही परिस्थितीत परळी विधानसभा मतदारसंघात आपल्याला विजयी गुलाल लागला पाहिजे यासाठी पूर्ण ताकतीने मैदानात उतरा असा आदेश दिला. आम्ही स्वतः पदाधिकाऱ्यांच्या कार्यकर्त्यांच्या पूर्ण ताकदीने पाठीशी आहेत तुम्ही काळजी करू नका मी सदैव तुमच्या सोबत आहे अशी ग्वाही याप्रसंगी शरदचंद्रजी पवार साहेब यांनी पदाधिकाऱ्यांना दिली. याप्रसंगी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज, विधानसभा अध्यक्ष किरण काका पवार, शहराध्यक्ष अँड जीवनराव देशमुख आदी उपस्थित होते.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ५ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# राज ठाकरेंची दुकानदारी लवकरच बंद होईल रामदास आठवलेंचा संघर्ष कायम सुरू राहील

लेखक — हेमंत रणपिसे

मनसेचे नेते राज ठाकरे यांची नुकतीच एका राष्ट्रीय वृत्तवाहिनीवर मुलाखत घेण्यात आली.त्यात एका प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी रामदास आठवले यांच्यासारखे मंत्रिपद मला मिळाले तर मी माझा पक्ष बंद करेल असे अवमानकारक विधान केले होते. राज ठाकरेंचे हे विधान म्हणजे रामदास आठवले यांचा आणि सामाजिक न्याय मंत्रालयाचा आवमान आहे. राज ठाकरे यांचे विधान अत्यंत चुकीचे आहे.जातीभेदाचा दर्प असणारे विधान आहे .त्यांच्या या भूमिकेचा आम्ही तीव्र निषेध करतो. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले हे ज्या मंत्रालयाचे राज्यमंत्री आहेत ते भारत सरकारचे सामाजिक न्याय मंत्रालय आहे. या सामाजिक न्याय मंत्रालयात अनुसूचित जाती; इतर मागासवर्गीय ; दिव्यांग ; ज्येष्ठ नागरिक आणि ट्रान्सजेंडर तसेच व्यसनमुक्तीसाठी सामाजिक न्याय मंत्रालयाकडून काम केले जाते .समाजातील या दुर्बल वंचित घटकांना न्याय देणाऱ्या मंत्रालयाबद्दल राज ठाकरे यांचे विचार अत्यंत सरंजामशाहीचे आणि जातीभेदाचा दर्प असणारे आहे. सामाजिक न्याय मंत्रालयाला “असले” मंत्रालय असा अवमानकारक उल्लेख केल्याबद्दल आम्ही राज ठाकरेंचा तीव्र निषेध करतो.

सामाजिक न्याय मंत्रालय हे या देशाचे महत्त्वपूर्ण मंत्रालय आहे l.या मंत्रालयातून अनुसूचित जाती; इतर मागासवर्गीय समाज; दिव्यांग ; जेष्ठ नागरिक; ट्रान्सजेंडर आणि व्यसनाधीनते पासून मुक्ततेसाठी हे मंत्रालय काम करते. देशातील 75 टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या या मंत्रालयाच्या अंतर्गत येते.इतके हे महत्त्वपूर्ण मंत्रालय असून या मंत्रालयात केवळ अनुसूचित जातीच्या अर्थात दलितांच्या कल्याणाचे मंत्रालय असल्याने या मंत्रालयाबाबत राज ठाकरे ‘असले ‘मंत्रालय म्हणून हिणवण्याचा आणि अवमान करण्याचा राज ठाकरे यांनी प्रयत्न केला आहे . राज ठाकरे यांची वाटचाल हीच मुळात परिवर्तन धर्मनिरपेक्षता; सामाजिक समता नाकारणारी आणि विषमतेला आणि सनातनी विचाराला कवटाळणारी भूमिका राहिली आहे.राज ठाकरे सारखी व्यक्ती हे कबूल करणार नाहीत मात्र मनातून आकंठ जातीभेदात बुडालेले व्यक्ती ते आहेत. अधून मधून केलेल्या वक्तव्यातून त्यांच्यातील जातीभेदाचे विष बाहेर पडते. अनेकदा त्यांनी दलित आदिवासी ओबीसींच्या सामाजिक आरक्षणाला विरोध केला आहे. आरक्षणाला विरोध हा जातिभेदाला खतपाणी घालणारा; जातीय विष समाजात पेरणारा आहे. भारत देश लोकशाही प्रधान देश आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानावर भारत देशाची लोकशाही मजबूत उभी आहे. राष्ट्रीय एकात्मता समता बंधुता सामाजिक न्याय धर्मनिरपेक्षता या तत्त्वामुळे हा देश मजबूत आहे.भारतीय संविधानाने विविधतेने नटलेल्या भारत देशाला अखंड एकजूट ठेवलेले आहे.राज ठाकरे सारखे प्रांतवादी नेते मात्र संविधानाच्या या राष्ट्रीय एकात्मतेच्या भूमिकेवर घाला घालण्याचे काम करतात. प्रांतवाद हा या संविधानिक युगात किती योग्य आहे. मराठी गुजराती कानडी उत्तर भारतीय भय्या भागाव असे प्रांतवाद करून केवळ आपली राजकीय दुकानदारी चालवण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेवर हल्ला करणाऱ्या प्रांतवादाला वाढवण्याचे काम राज ठाकरे सरखे नेते करतात. या देशात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे समतेचे युग सुरू होत आहे. राष्ट्रीय एकात्मता; सर्वधर्मसमभाव; पूरोगामी विचार; सामाजिक परिवर्तनाचा विचाराला बळ मिळत जाणार असून या पुढे आम्ही सर्व भारतीय म्हणून देशात सामाजिक एकोपा निर्माण करून राष्ट्रीय ऐक्याचं वादळ या देशात उभे राहील तेव्हा राज ठाकरे सारख्यांची प्रांतवादाची दुकानदारी पालापाचोळ्या सारखी उडून जाईल. एकविसावे शतक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे संविधानाचे समतेचे भीम युग आहे. येणाऱ्या काळात या देशात समतेचे वादळ उभे राहील. विषमतेचा पालापाचोळा उडून जाइल .त्यात राज ठाकरेंचं दुकान जरूर बंद होईल. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले हे संघर्षातून उदयास आलेले नेते आहेत.त्यांनी गावागावात ; गल्लीगल्लीत काम करून आज ते दिल्लीत पोहोचले आहेत.राज ठाकरे तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले राजपुत्र आहेत .त्यांना गल्लीबोळातील गरिबांचे दुःख माहीत नाही. त्यांना संघर्ष माहित नाही .त्यांना राजकारणाची दुकानदारी माहित आहे.अनेकदा राज ठाकरेंनी राजकीय भूमिका बदललेली आहे. कधी मराठी भाषेचा प्रांतवाद तर कधी हिंदुत्ववाद या दोन्हीही वादाचा अतिरेक आणि त्यावर आधारित भेदभाव संविधानाला मान्य नाही. हा भेदभाव भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेवर घाव घालणारा आहे. राज ठाकरेंची सामाजिक भूमिका ही कधीही समतेची; सामजिक परिवर्तनाची आणि सामाजिक सुधारणेची राहिलेले नाही.ते स्वतः एक व्यंगचित्रकार आहेत .त्यांना मात्र कधीही हिंदू धर्मातील जुन्या चालीरीतीमधील व्यंग आणि चुकीच्या गोष्टी दिसल्या नाहीत. त्यांच्या व्यंगचित्रात कधीही सामाजिक व्यंगावर प्रहार दिसला नाही. दलित आदिवासींवरील अन्याय आणि त्यांचे प्रश्न राज ठाकरेंनी त्यांच्या व्यंगचित्रातून कधी मांडले नाहीत. दलित अत्याचाराच्या प्रश्नांवर ते घुमे मूकबधिर होऊन बसतात. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ;महात्मा ज्योतिबा फुले राजश्री शाहू महाराज या महामानवांचा राज ठाकरे यांना फारसा अभ्यास नाही. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचा राज ठाकरेंना गंध नाही. आगामी काळात या देशात समतेचे युग आणि समतेचे वादळ सुरू होणार आहे.त्यात राज ठाकरेंचे प्रांतवादी दुकान वाहून जाणार आहे. रामदास आठवले सारख्या संघर्ष नायकावर टीका करणे योग्य नाही. रामदास आठवले हे प्रचंड कष्टाने घडलेले नेते आहेत. प्रचंड संघर्ष करून उभे राहिलेले संघर्ष नायक आहेत. राजकारणात त्यांचा विरोधी पक्षाशी संघर्ष असतोच पण त्याचवेळी मित्र पक्षाशी त्यांना संघर्ष करावा लागतो. राजकारणातील अत्यंत मुत्सद्दी नेतृत्व रामदास आठवले आहेत. त्यांनी घेतलेल्या भूमिका कालांतराने अनेकांनी रामदास आठवलेंच्या भूमिकांचं अनुकरण केलेला आहे.

आज राज ठाकरे सुद्धा भाजपशी युती करू पाहत आहेत.रामदास आठवलेंच्या पावलांवर पाऊल टाकण्याचा प्रयत्न राज ठाकरे करीत आहेत. राजकारणात रामदास आठवले बाप माणूस आहे. त्यांना कोणत्या वेळी कोणता निर्णय घ्यायचा त्याची चांगली समज आहे. राज ठाकरे यांनी यापूर्वी घेतलेले निर्णय स्वतःच बदललेले आहेत .

## विधानसभेच्या विजयासाठी अमरसिंह पंडित यांनी डॉ.योगेश क्षीरसागरांना दिल्या शुभेच्छा

बीड (प्रतिनिधी) दि.४ : महायुतीचे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी शहरातील शिवछत्र निवासस्थानी भेट देत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार अमरसिंह पंडित यांना दीपावली पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या व आशीर्वाद घेतले. यावेळी त्यांनी डॉ.योगेशभैय्यांचा सत्कार करून निवडणूक जिंकण्यासाठी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. याप्रसंगी राष्ट्रवादी अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, नगरसेवक शुभम धुत, नबील जमा, शुभम कातांगळे, रौफ मोमीन, बाबा खान, सागर वाव्हुळ, अभिनंदन सारडा आदी उपस्थित होते. अमरसिंह पंडित यांनी बीड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मोठी ताकद असून पक्षाला मानणारा वर्ग असल्याचे सांगितले. आगामी काळात ना.अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली बीड विधानसभा निवडणुकीत विजय मिळविण्याच्या दृष्टीने रणनीती कशी



असावी, यासंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे आशीर्वाद घेतले.

## तपासणी दरम्यान आढळून आलेले एक लाख जप्त

बीड, दिनांक ०४ – : २३०–बीड विधानसभा मतदार संघामध्ये ०३.११.२०२४ रोजी रात्री १.३० च्या दरम्यान एफएसटी (गस्ती) पथकाच्या तपासणी दरम्यान शिवराज पान सेंटर जवळ गाडी क्र. चक १२ ऋध ७९९४ (स्विफ्ट कार) मध्ये रु १.०० लक्ष रुपयांची रक्कम आढळून आली. संबंधित गाडीचालक यांना सदरील रक्कमेबाबत समाधानकारक खुलासा सादर करता आला नाही. त्यामुळे सदरील रु. एक लक्ष रक्कम जप्त केल्याचे बीड निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती कविता जाधव यांनी कळवले आहे. एफएसटी (गस्ती) पथक क्र.०७ पथक प्रमुख श्री. लोकरे व त्यांच्या टीमने ही कार्यवाही केली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मौजे घाटसावळी, चौसाळा व राजुरी नवगण येथे स्थिरपथक स्थापन करण्यात आलेले आहेत. तसेच ९ एफएसटी (गस्ती) पथके कार्यरत असून सदरील पथकामार्फत दिवसा व रात्री वाहनाची तपासणी करण्यात येत असल्याचेही त्यांनी कळवले आहे.

## जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने कर्जत तालुक्यातील कडाव येथील सापेले आदिवासी पाड्यावर फराळ वाटप...!

कर्जत(प्रतिनिधी–गुरुनाथ तिरपणकर) जनजागृती सेवा संस्था ही सामाजिक क्षेत्रात नेहमीच समाजाचे गांभिर्य लक्षात ठेवून वावरत असते.विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून ही संस्था आणि संस्थेचे सभासद समाजकार्य करण्यासाठी नेहमीच तयार असतात.कर्जत येथील संस्थेच्या सदस्यांनी हा फराळ वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला होता. दीपोत्सव अर्थात अंधार भेदून



प्रकाशाकडे घेऊन जाण्याचा संदेश देणारा सण. गरीब व गरजू लोकांची दिवाळी गोड जावी या उद्देशाने दिवाळी पाडव्याचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेने कर्जत तालुक्यातील कडाव येथील सापेले आदिवासी पाड्यावर लहान मुलांना चॉकलेट, आदिवासी भगिनींना आकर्षक पणती व फराळ वाटप करण्यात आले.प्रमुख पाहुणे म्हणून माऊली फाऊंडेशनचे उपाध्यक्ष व पत्रकार पंकेश जाधव,ॲड.सई सावंत, वनिता पाटील, रोहित पाटील हे उपस्थित होते. आदिवासी पाड्यावरील भगिनींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फराळ वाटप करण्यात आला. फराळ वाटप उपक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन भंडारी, दत्ता कडुलकर,गंधाली तिरपणकर, संचिता भंडारी, पत्रकार पंकेश मधुकर जाधव, सार्थक भंडारी यांनी विशेष परिश्रम घेतले. हा उपक्रम संस्थेच्या सचिव सौ.संचिता सचिन भंडारी यांनी स्वतः पुढाकार घेऊन यशस्वीरित्या राबविला,त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी त्यांचे विशेष आभार मानले. शेवटी उपस्थित बंधु–भगिनींना दिवाळी पाडव्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

## वंचितांबरोबर साजरी केली दिवाळी

काव्ययोग काव्य संस्था तसेच वसुधा इंटरनॅशनल पोलिस मित्र संघटना पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मवंचिताबरोबर साजरी करूया दिवाळीफ तसेच पुण्यातील नामवंत कवींचे मकवी संमेलनफ आयोजित केले होते.फएक क्षण आनंदाचाफ सामाजिक संस्था अप्पर इंदिरानगर,पुणे येथे करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.मधूसुदन घाणेकर एकपात्री कलाकार तसेच प्रमुख पाहुणे राजेश्वर हेंद्रे राष्ट्रीय सल्लागार युवा क्रांती पोलीस मित्र संघटना,शहाजी जगताप पोलीस मित्र तसेच

वसुधा इंटरनॅशनच्या संस्थापिका सौ. वसुधा ताई नाईक या वेळी उपस्थित होते.यात मुलांना कविता कश्या असतात त्या

कश्या सादर करायच्या या साठी नामवंत कवींचे मकाव्य संमेलनफ घेण्यात आले.त्यात शुभांगी पाटील,सारिका बनसोडे,विजय सातपुते,विवेक करंजीकर,कविता काळे,सारिका सासवडे, शरदचंद्र काकडे,राम सर्वगोड ह्या सर्व कवींनी आपल्या कवितेने मुलांना मंत्र मुग्ध केले.ज्यांना कोणी नाही त्यांना काही देण्याचे काम करावे.जेणेकरून आपल्याला त्याचा आशीर्वाद मिळतो.सामाजिक कार्य हातून घडते.म्हणून ही कल्पना सौ.वसुधा नाईक यांनी आपल्या सहकार्यातून वंचित मुलांसाठी दिवाळी फराळ,खाऊ,शालेय साहित्य वाटप करण्यात आले .

त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद काही निराळाच होता.

ज्यातून आपल्याला समाधान मिळते तेच कार्य करणे गरजेचे असते.असे मनोगत वसुधा नाईक यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.सायली ढबे यांनी केले.

या कार्यक्रमाचे आयोजन गौरव पुंडे यांनी केले.तसेच आभार काव्ययोग काव्य संस्थेचे अध्यक्ष यांनी योगेश हरणे यांनी केले.



# बीड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नेते, पदाधिका–यांच्या प्रवेशाचा ओघ सुरुच

बीड (प्रतिनिधी) दि.४ : बीड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नेते, पदाधिकाऱ्यांच्या प्रवेशाचा ओघ सुरूच आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या विचाराने प्रेरित होवून अनेकांनी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष तथा महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन दरदिवशी प्रवेश सोहळे होत आहेत. पक्षात येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे. बीड तालुक्यातील तळेगाव येथील माजी उपसरपंच गणेश घोलप, माजी ग्रा.पं.सदस्य गंगाराम महाकुडे, ग्रा. पं.सदस्य सिद्धार्थ महाकुडे, अशोक घोलप, रितेश सौदा, मंगेश वाघमारे, आकाश महाकुडे आदींनी प्रवेश केला. हिवरापहाडी, अंजनवती येथील रमेश जाधव, भिमराव पालवे, अशोक पालावे, बंडू गोरे, अंनत शिंदे, राहुल आनेराव, गोकुळ शिंदे, आंधारीनाथ





काबळे, समीर पालवे, नारायण देवकते आदींनी प्रवेश केला. अंजनवती येथील अशोक शिंदे, अनिल शिंदे, अविनाश शिंदे, राम शिंदे, दत्ता शिंदे, राहुल शिंदे, बप्पा शिंदे, बन्सी शिंदे, रामहरी येडे, कृष्णा शिंदे, मेघराज येडे, संतोष शिंदे, सुरेश टाकळे आदींनी प्रवेश केला. रायमोहा येथील माजी सरपंच शेख हाशम यांच्यासह सोहेल शेख, प्रदीप जाधव, बाळासाहेब मिसाळ, उद्धव विघ्ने, टाकळवाडीचे उपसरपंच रामहरी कदम, माजी उपसरपंच सुदाम नागरे, काळू नागरे, भाऊसाहेब जायभाय, लाला पठाण, चेअरमन रशीद पठाण, महेश चव्हाण, लहू गायकवाड, बाबू समगे, शमशेर पठाण, मोहसीन पठाण, राम पालवे, बाळू गणपत, राजू सानप, श्रीकांत विघ्ने, लियाखत शेख, योगेश तांबारे, जालिंदर नेमाने, भरत कोकाटे, गणेश कंठाळे, अजिंक्य जाधव, मुन्ना पठाण, गणेश सानप, साहिल शेख, कैलास पवार, अविनाश काळे, प्रेम काळे, भगवान चव्हाण, युवराज चव्हाण, प्रल्हाद चांदणे, अक्षय सानप, रोहन पवन चांदणे, कैलास पवार, ओम चांदणे आदींनी प्रवेश केला.

### बीड शहरातून दरदिवशी होतायेत प्रवेश

बीड शहरातून दरदिवशी प्रवेश होत असून तेरवी लाईन, अजिजपुरा भागातील युवा नेते केशव रत्नपारखे यांच्यासह अनेक तरुण, महिलांनी पक्षात प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, नगरसेवक रवींद्र कदम, संदीप डावकर, शुभम कातांगळे, शैलेश गिरी, नंदन पवार, विशाल मोरे, विक्रम चव्हाण, अनिल देवतरासे आदी उपस्थित होते.

### नीळकंठेश्वर महादेव मंदिरात डॉक्टर दाम्पत्याकडून आरती

बीड शहरातील नीळकंठेश्वर महादेव मंदिरात डॉ.योगेश व डॉ.सारिकाताई यांनी मनोभावे आरती केली व दर्शन घेतले. यावेळी माजी नगरसेवक नामदेवराव दुधाळ, पानखडे, गोरे, घोडके महाराज, विद्याभुषण बेदरकर, गोरख यादव, राजेंद्र गोरे, रामचंद्र ढोले, कैलास पांचाळ, प्रकाश मोरे, भाग्यश्री पांचाळ, माजेद कुरेशी आदी उपस्थित होते.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ५ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# बंडखोरांमुळे महायुती अनब मविआचं टेन्शन वाढलं, कुठं-कुठं बसणार फटका?

आज विधानसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपली आहे. राज्यात निर्माण झालेल्या गुंतागुंतीच्या राजकीय परिस्थितीमध्ये यावेळच्या विधानसभा निवडणुकीत बंडखोरांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. बंडखोरांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घ्यावेत यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत महायुती आणि महाविकास आघाडीमधील नेत्यांकडून त्यांची मनधरणी करण्यात आली. काही ठिकाणी यश आलं मात्र अनेक ठिकाणी बंडखोरांनी आपले उमेदवारी अर्ज कायम ठेवले आहेत. त्यामुळे आता अनेक विधानसभा



मतदारसंघात तिरंगी, चौरंगी लढत होणार असून, याचा मोठा फटका हा अधिकृत उमेदवारांना बसण्याची शक्यता आहे. बंडखोरांमुळे महायुती आणि महाविकास आघाडीची डोकेदुखी वाढली आहे.

## कुठे कुठे बंडखोरी?

पुण्यातील कसबा मतदारसंघात महाविकास आघाडीमध्ये बंडखोरी झाली आहे. कमल व्यवहारे यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. अर्ज मागे घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले, मात्र ते निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत. हिंगणघाट विधानसभा मतदारसंघात देखील महाविकास आघाडीत बंडखोरी झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी आमदार राजू तीमांडे यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. तर सुधीर कोठारी यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. या मतदारसंघातून मविआकडून अतुल वांदीले यांना उमेदवारी देण्यात आली आहे.



माजलगाव विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार मा.रमेशराव आडसकर साहेब यांनी प्रचार दौरा निमित्त केसापुरी, भाटवडगांव, फुले पिंपळगांव मनुरवाडी ढेपेगांव,मनुरस्ती, मनुर. या गावांमध्ये प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने भेटी दिल्या. या दौऱ्यात गावातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या वेळी नेते,पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून वडवणी येथील युवकांचा उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेत प्रवेश

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या विचाराने प्रेरित होऊन व शिवसेनेचे नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब व शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब व शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव व सह संपर्कप्रमुख डॉ लक्षराजजी सानप साहेब व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून व शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वडवणी तालुक्यातील युवा नेते एकनाथ पवार व त्यांचे सहकारी अमोल आडे, कृष्णा राठोड, संतोष आडे, अस्लम सय्यद, शेख इम्रान, अजय पवार, शिवाजी पवार, अतुल आडे, विकास राठोड, अजय शेजुळ, यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात) प्रवेश केला. यावेळी शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनी त्यांचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)परिवारात शिवबंधन बांधून स्वागत केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. माजलगाव विधानसभा मतदारसंघातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची ताकद वाढली असून माजलगाव विधानसभेतील अनेक नवतरुण व इतर पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करण्यास इच्छुक आहेत असे शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी यावेळी सांगितले. शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्यावर माजलगाव मतदारसंघाची जबाबदारी आल्यापासून या भागामध्ये जिल्हाप्रमुखांच्या माध्यमातून उत्तम संघटन, नव्या जुन्याचा मेळ घालून या भागात शिवसेनेची ताकद वाढताना दिसून येते आहे.माजलगाव, धारुर व वडवणी येथील अनेक इतर पक्षांतील युवक येणाऱ्या काळामध्ये जिल्हाप्रमुखांच्या नेतृत्वाखाली पक्ष प्रवेश करण्यासाठी इच्छुक आहेत... याप्रसंगी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी युवकांच्या प्रवेश प्रसंगी सांगितले, तुमच्या सर्व अडी अडचणी प्रसंगी व सर्व सामान्यांच्या सुख दुःखात शिवसेना जिल्हाप्रमुख म्हणून मी आपल्या सोबत राहील.... शिवसेनेचे पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांना पुन्हा एकदा राज्याचे मुख्यमंत्री करण्यासाठी माजलगाव मतदारसंघातील शिवसेनेची ताकद वाढविण्यासाठी आपण सर्वांनी जोमाने कामाला लागायचे आहे.पुढील काळातही शिवसैनिकांनी निष्ठेने व प्रमाणीकपणे काम केल्यास महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप यांची ताकद वाढेल व त्यांना विजयी करण्यासाठी शिवसेनेचा मोलाचा वाटा राहील यात तिळमात्रही शंका नाही... याप्रसंगी युवा सेनेचे जिल्हा युवा अधिकारी अभिषेक दिवे, सखाराम तात्या मोहिते, दीपक घोडके पाटील, विनोद गुंड पाटील, अजय गायकवाड, राकेश ढोले सह सर्व उपस्थित होते...!!

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली प्रकाश आंबेडकर यांच्या प्रकृतीची चौकशी

मुंबई : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज वंचित बहुजन आघाडी चे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या प्रकृतीची दूरध्वनीद्वारे चौकशी केली. प्रकाश आंबेडकर यांना पुण्यातील रुग्णालयातुन डिस्चार्ज देण्यात आला आहे. आता त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती त्यांच्या पत्नी अंजलीताई प्रकाश आंबेडकर यांनी ना.रामदास आठवले यांना दिली.पुण्यात जाऊन लवकरच आपण प्रकाश आंबेडकर यांची भेट घेणार असल्याचे ना.रामदास आठवले यांनी अंजलीताई आंबेडकर यांना सांगितले.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आणि आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते ॲड.प्रकाश आंबेडकर यांची प्रकृती अस्वस्थ असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल केल्याची माहिती मिळाल्यानंतर ना. रामदास आठवले यांनी अत्यंत काळजीने प्रकाश आंबेडकर यांच्या प्रकृतीची चौकशी दूरध्वनी द्वारे केली.आता ॲड.प्रकाश आंबेडकर यांची प्रकृती स्थिर आहे.त्यांची ॲंजीयोप्लास्टी करण्यात आली असून आता त्यांची प्रकृती चांगली आहे ॲड. प्रकाश आंबेडकर यांची प्रकृती लवकर चांगली व्हावी अशा शुभेच्छा देऊन लवकरच पुण्यातील निवासस्थानी आपण ॲड प्रकाश आंबेडकर यांची भेट घेणार असल्याचे ना.रामदास आठवले यांनी सांगितले.

# हिलींग हॅन्ड्स हॉस्पिटल चे प्रज्ञा दीदी, डॉ. देशपांडे, डॉ. वनवे यांच्या उपस्थितीत उद्घाटन संपन्न

बीड (प्रतिनिधी) - डॉ. आदित्य कुलथे यांच्या हिलींग हॅन्ड्स हॉस्पिटल चे प्रजापिता ब्रह्मकुमारी कन्याकुमारीच्या प्रज्ञा दीदी, इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अविनाश देशपांडे, डॉ. उज्वला वनवे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर शनिवार दिनांक ०२ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता उद्घाटन करण्यात आले. शहरातील बी.एस.एन.एल. ऑफीस जवळ, डी.पी. रोड, क्रांती नगर, बीड येथे हिलींग हँड्स या हॉस्पिटलच्या उद्घाटन समारंभासाठी आयोजित कार्यक्रमात उद्घाटक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अविनाश देशपांडे, डॉ. उज्वला वनवे, प्रज्ञा दीदी, मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर ज्येष्ठ इतिहासकार, साहित्यिक, नाटककार, सुप्रसिद्ध लेखक तथा सेवानिवृत्त सहशिक्षक डॉ. सतीश साळुंखे, डॉ. संदीप बेदरे आणि आदर्श सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष परवेज़ सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक तथा सूत्रसंचालन पत्रकार ॲड. संदीप बेदरे यांनी केले तर कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन डॉ. आदित्य कुलथे यांनी केले. उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमासाठी डॉ. सुवर्णा बेदरे कुलथे, सत्यकुमार



कुलथे, श्रीकांत बेदरे, ॲड. संदीप बेदरे, संजयकुमार कुलथे यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com